# संपदा सहकारी बँक लि. पुणे

मुख्य कार्यालय : ७१७, बुधवार पेठ, डी.आय.सी. बिल्डींग, पुणे - ४११००२.

---

## सेफ डिपॉझिट व्हॉल्ट भाडे करारनामा

हा करारनामा आज दिनांक ________________ रोजी पुणे येथे खालील पक्षकारांच्या दरम्यान निष्पादित झाला तो येणेप्रमाणे :

**संपदा सहकारी बँक लि. पुणे,**

महाराष्ट्र सहकार कायदा १९६० अन्वये नोंदणी झालेली सहकारी बँक,

यांचे मुख्य कार्यालय, ७१७, बुधवार पेठ, डी.आय.सी.सी. बिल्डींग,

पुणे - ४११००२ आणि शाखा कार्यालय ____________________ येथे

(यांचा उल्लेख यापुढे 'बँक' असा केला आहे)

________ ल्हिून घेणार

**आणि**

१.श्री/सौ/कु. ________________________________________ वय ______ वर्षे

व्यवसाय : ________________________________________

राहणार ________________________________________

________________________________________

२.श्री/सौ/कु. ________________________________________ वय ______ वर्षे

व्यवसाय : ________________________________________

राहणार ________________________________________

________________________________________

(यात त्यांच्या वाली वारसांचाही समावेश असेल )

________ ल्हिून देणार

(अ) लिहून घेणार यांचा व्यवसाय बँकींगचा आहे. त्याचाच भाग म्हणून बँक आपल्या खातेदारांना सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सुविधा काही अटी आणि शर्तींवर आणि त्यासाठी भाडे आकारून प्रदान करते.

(ब) लिहून देणार यांना त्यांचे जिन्नस ठेवण्यासाठी लॉकर ची आवश्यकता होती, त्यासाठी त्यांनी बँकेकडे केलेल्या अर्जानुसार बँकेने यावावत रिझर्व बँकेने घालून दिलेले नियम आणि निर्देश यास अधीन राहून आणि बँकेचे नियम, अटी आणि शर्तींवर ________________ या प्रकारचा लॉकर क्र. ________________ लिहून देणार यांना देण्याचे मान्य केले. त्यासाठीचे सध्याचे मासिक/वार्षिक भाडे रक्कम रु. ______________ आकारले जाईल.

(क) बँकेचे या बाबतचे नियम, रिझर्व बँकेने घालून दिलेले नियम आणि अटी आणि शर्तीं लिहून देणार यांनी मान्य करून त्याचे काटेकोर पालनासाठी खालीलप्रमाणे भाडे करारनामा लिहून दिला तो येणेप्रमाणे :

१. लिहून देणार यांनी बँकेस केलेल्या अर्जानुसार आणि त्यांनी बँकेस दिलेल्या KYC कागदपत्रांवर विसंबून राहून बँकेने त्यांच्या ________________________________ शाखेतील ________________________ प्रकारचा लॉकर क्र. ______________ बँकेने __________ महिन्या/वर्षासाठी भाडे तत्वावर आणि बँकेचे आणि रिझर्व बँकेने घालून दिलेले नियम आणि या पुढे दिलेल्या अटी आणि शर्तींवर लिहून देणार यांना वापरण्यास दिला आहे. कराराच्या अटी आणि शर्तीं, नियम लिहून देणार यांनी वाचून आणि समजून घेतल्या आहेत, ते त्यांना मान्य आणि कबूल आहेत आणि त्याचे ते काटेकोरपणे पालन करतील. याचा भंग झाल्यास सदरचा करार रद्द करण्याचे अधिकार बँकेस राहतील.

२. सदर लॉकर चे भाड्यापोटी लिहून देणार यांनी प्रतिवर्षी रक्कम रु. ________________ चे भाडे आगाऊ देण्याचे आहेत. त्याशिवाय कराराच्या सुरवातीस तीन वर्षाच्या भाड्या इतक्या रकमेची आणि लॉकर ब्रेक ओपन करण्याचा खर्च अशी रक्कम रु. ___________ ची ठेव लिहून देणार यांनी बँकेकडे ठेवायची आहे. या करारात नमूद केलेल्या बँकेस देय होणाऱ्या कोणत्याही रकमांची वसुली या ठेव रकमेतून करण्याचे अधिकार बँकेस राहतील.

३. कराराची मुदत आजपासून __________ महिने/वर्षे राहील. ही मुदत संपतांना जर लिहून देणार यांना करार पुढे चालू ठेवायचा नसेल तर त्यांनी याबाबतची सूचना करार संपण्याच्या दिनांकाच्या पूर्वी किमान १ महिना देणे आवश्यक राहील. मात्र अशी सूचना न दिल्यास

आणि बँकेने हा करार रद्द न केल्यास सदरचा करार पुढे चालू राहू शकेल.

४. जर कराराची मुदत संपण्यापूर्वी लिहून देणार यांना करार रद्द करून लॉकर वापर थांबवण्याचा असेल तर त्यासाठी त्यांनी बँकेस ३ महिने पूर्वी तशी लेखी सूचना बँकेस देणे आवश्यक राहील. अशा परिस्थितीत लॉकर रिकामा करून त्याची किल्ली बँकेस प्राप्त झाल्यानंतर बँकेस देय असलेल्या रकमांच्या वसुलीनंतर कराराचे उर्वरित कालाविधीचे भाडे बँक परत करेल. मात्र कराराचा भंग केल्याच्या कारणास्तव बँकेने करार रद्द केला असेल तर पुढील कालावधीसाठीचे भाडे परत मिळणार नाही.

५. मुदतीपूर्वी सदर सुविधा रद्द, बंद करणे बँकेस आवश्यक वाटल्यास तीन महिन्याची पूर्व सूचना देऊन बँक ती सुविधा रद्द करून लॉकर रिकामा करून त्याचा ताबा मागू शकेल. कराराचा भंग केल्यास अथवा या करारात नमूद केलेल्या परिस्थितीत सुविधा रद्द करण्याचा अधिकार बँकेस राहिल.

६. अशा परिस्थितीत लॉकर रिकामा करून त्याची किल्ली बँकेस त्वरित देणे आवश्यक राहील. त्याबाबत सहकार्य न केल्यास, किल्ली परत न केल्यास लॉकर ब्रेक ओपन करून सक्तीचा ताबा घेण्याचा बँकेस अधिकार राहील आणि त्यापोटी होणाऱ्या खर्चास लिहून देणार जबाबदार राहतील.

७. अशाच प्रकारे जर काही कारणाने, जसे की बँकेचे विलीनीकरण, शाखा बंद होणे, शाखेचे/लॉकरचे स्थलांतर होणे लॉकर सुविधा दुसरीकडे हलविणे, यामुळे लॉकर सुविधा सध्याच्या शाखेत देणे शक्य झाले नाही तर बँक लिहून देणार यांना लॉकर अन्यत्र उपलब्ध करून देणे अथवा सुविधा रद्द करणे असे पर्याय देईल आणि त्यासाठी किमान २ महिन्याची सूचना लिहून देणार यांना देईल. मात्र नैसर्गिक आपत्तीमुळे अथवा न टाळता येणाऱ्या परिस्थितीमुळे अशी सुविधा न मिळाल्यास त्यासाठी बँकेस जबाबदार धरता येणार नाही, त्यासाठी नुकसान भरपाई मागता येणार नाही.

८. भूकंप, पूर, वीज कोसळणे, वादळ, अशा सारख्या नैसर्गिक आपत्ती, परचक्र, विघातक कृत्ये, आतंकवादी कृत्ये अशा कारणांमुळे अथवा लिहून देणार स्वतःच ज्यास जबाबदार असतील अशा कारणांमुळे जर लॉकर आणि त्यातील ऐवज याचे काही नुकसान झाल्यास त्यास बँक जबाबदार राहणार नाही.

९. या करारात असलेल्या पक्षाकारांशिवाय ही सुविधा अन्य कोणास वापरता येणार नाही. एकापेक्षा अधिक व्यक्तींच्या नावे लॉकर दिला असल्यास त्याचे परिचालन/वापर याबाबत त्यांनी संयुक्तपणे दिलेल्या सूचनेनुसार जसे की 'लिहून देणार यांचेपैकी कोणीही अथवा हयात व्यक्ती,' ''क्र. १ अथवा हयात,''अशा प्रकारे करता येईल. मात्र अशी कोणतीही विशेष सूचना दिलेली नसेल तर त्याचे परिचालन सर्व लॉकर धारकांना संयुक्त् पणेच करणे आवश्यक राहील. एकापेक्षा अधिक पक्षकारांच्या बाबत त्यांनी दिलेल्या विशेष सूचना जर कोणी एक अथवा अनेक व्यक्तींनी रद्द केल्या, मागे घेतल्या अथवा परिचालन कोणासही करू न देण्याच्या सूचना बँकेस दिल्यास बँक असे परिचालन केवळ सर्व व्यक्तींच्या संयुक्त स्वाक्षरीनेच करू दिले जाईल.

१०. लॉकर ला दोन किल्ल्या असतील; त्यापैकी एक master key ही बँकेकडे असेल, तर दुसरी किल्ली लिहून देणार यांच्या ताब्यात दिली जाईल. लॉकर वापरतांना या दोन्ही किल्ल्या वापरूनच तो उघडता येतो; मात्र बंद करतांना केवळ लिहून देणार यांच्याच किल्लीने बंद करता येतो. लिहून देणार यांनी त्यांची किल्ली सुरक्षित आणि जपून ठेवणे, ती हरविणार नाही, अन्य व्यक्तीच्या ताब्यात पडणार नाही याची काळजी घ्यावयाची आहे. किल्ली कोणत्याही कारणाने मिळू न शकल्यास त्याची duplicate किल्ली नसते आणि त्या परिस्थितीत जर लिहून देणार यांना लॉकर उघडायचा असेल, त्याचे कुलूप बदलून घ्यावयाचे असेल तर त्यासाठी सर्व लिहून देणार यांच्या संयुक्त सहीने बँकेस अर्ज देऊन बँकेने ठरविलेल्या नियमानुसार आणि पद्धतीनुसार लॉकर ब्रेक ओपन करता येऊ शकेल, मात्र त्याचा सर्व खर्च लिहून देणार यांनी आगावू भरण्याचा आहे.

११. लॉकर मध्ये ठेवलेल्या अथवा काढून घेतलेल्या जिन्नसांची माहिती, नोंद बँक ठेवत नाही, या जिनसा ठेवणे आणि काढणे हे सर्व लिहून देणार यांनी त्यांच्या स्वतःच्या जोखीम आणि जबाबदारीवर करावयाचे आहे; त्याबाबतची बँकेची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. तसेच त्यांचा विमा काढणे, जोखीम पत्करणे अथवा अन्य कोणत्याही प्रकारची जबाबदारीही बँक स्वीकारीत नाही. तसेच उघडलेला लॉकर काळजीपूर्वक बंद करणे, वस्तू आणि किल्ली सुरक्षित ठेवणे याची सर्व जबाबदारी लिहून देणार यांची राहील. जर लॉकर योग्य रीतीने बंद केलेला नसेल तर तो पुढील सुरक्षेसाठी बंद करून ठेवण्यात येईल. मात्र त्याबाबत बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

१२. लॉकरमध्ये ठेवायच्या आणि काढावयाच्या जिनसांच्या सुरक्षेची काळजी लिहून देणार यांनी घ्यावयाची आहे. भाड्याने दिलेल्या लॉकरचा वापर केवळ वैध कारणांसाठीच करावयाचा आहे, त्यात ठेवण्याच्या वस्तू खराब होणाऱ्या अथवा इतर वस्तू खराब होण्याजोग्या नसतील याची खातरजमा लिहून देणार यांनी करावयाची आहे. तसेच लॉकर चा वापर धोकादायक, ज्वलनशील, गुन्ह्यातील वस्तू, स्फोटक द्रव्ये, स्फोटके, हत्यारे, अवैध संपत्ती, जिनसा या साठी करावयाचा नाही, या जिनसांमुळे इतर वस्तूंना धोका निर्माण होणार नाही, हानी होणार नाही याची काळजी

घ्यावयाची आहे. अशा प्रकारच्या कोणत्याही वस्तूबाबत बँकेस काही संशय आल्यास लिहून देणार यांनी त्वरित आणि विनाविलंब त्याचे निराकरण करणे, आपत्तीजनक वस्तू काढून घेणे लिहून देणार यांचेवर बंधनकारक राहील. जर निर्धारित वेळेत या बाबतच्या सूचनांचे पालन न केल्यास त्याबाबत पोलिसांना कळविणे, अथवा अन्य कायेदशीर मार्ग अवलंबिणे, आणि आवश्यक वाटल्यास लॉकर ब्रेक ओपन करून खातरजमा करून घेणे, वस्तू अन्यत्र हलविणे, लॉकर सुविधा रद्द करणे, असे सर्व अधिकार बँकेस असतील आणि त्याच्या खर्च आणि परिणामांची जबाबदारी सर्वस्वी लिहून देणार यांची असेल.

१३. लॉकर वापराबद्दल बँकेच्या पद्धती नुसार त्याची शिस्त पाळणे आवश्यक असेल. बँकेस आवश्यक वाटले तर आपली ओळखपत्रे, दस्तऐवज बँक मागू शकेल. बँकेच्या नियमानुसार नोंदी करणे आवश्यक राहील. असलेल्या जागेचा एका वेळी एकाच ग्राहकास वापर करता येईल याचे भान ठेवून इतरांना त्रास, वेळेचा अपव्यय, गैरसोय होणार नाही याची काळजी लिहून देणार यांनी घ्यावयाची आहे.

१४. लॉकर साठी बँकिंग रेग्युलेशन कायद्यानुसार नामांकन (NOMINATION) सुविधा उपलब्ध आहेत. त्याची माहिती करून घेऊन नामांकन करणे इष्ट राहील.

१५. मृत्यु पश्चात दाव्यांचा निपटारा :

लॉकर एकाच व्यक्तीच्या नावे असेल तर –

**<u>नामांकन असल्यास :</u>**

i. नामांकन बँकिंग रेग्युलेशन नियमानुसार असणे आवश्यक. अशा बाबतीत नामांकित व्यक्तीने (nominee) दावा केल्यास अशा व्यक्तीची योग्य ओळख पटल्यानंतर बँकेच्या धोरणानुसार आणि बँकेच्या पद्धतीनुसार लॉकर परीचालीत करून जिन्नस नामांकित

व्यक्तीस त्याची यादी करून देण्यात येतील.

ii. नॉमिनी कडे लॉकर ची किल्ली उपलब्ध नसेल तर त्यांच्या विनंतीनुसार लॉकर ब्रेक ओपन करावा लागेल, ज्याच्या खर्च, परिणामांची सर्वस्वी जबाबदारी नॉमिनीची राहील.

iii. कायद्याप्रमाणे नॉमिनी हा त्या ऐवजाचा मालक असेलच असे नाही. जर त्यावर इतर वारसांचा हक्क असेल तर तो हक्क केवळ जिन्नस, ऐवज किंवा रक्कम नॉमिनीस दिली म्हणून संपुष्ठात येत नाही.

**<u>नामांकन नसल्यास :</u>**

मृतक दाव्यांच्या निपटाऱ्यासाठी बँकेने निर्धारित केलेल्या प्रक्रीये नुसार आवश्यक ती कागदपत्रे सादर करून त्यास बँकेची मंजुरी मिळाल्यानंतर त्यानुसार पात्र व्यक्तींना तसेच अशा बाबतीत जर दावेदारांनी सक्षम न्यायालयाचा हुकूम मिळविला असेल तर अशा व्यक्तींना परीचालन करता येईल अथवा लॉकर मधील जिन्नस त्याची यादी करून काढून घेण्यास परवानगी देण्यात येईल. याही बाबत किल्ली नसेल तर अशा व्यक्तींच्या अर्जावरून लॉकर ब्रेक ओपन करण्याची प्रक्रिया करावी लागेल, ज्याच्या खर्च व परिणामाची जबाबदारी अशा अर्जदारांची राहील.

**<u>लॉकर एकापेक्षा अधिक व्यक्तींच्या नावाने असल्यास</u>**

जर त्यांनी परीचालानासाठी विशेष सूचना (जसे ''कोणीही एक अथवा हयात'') दिल्या असतील तर त्या सूचनांप्रमाणे अन्यथा मृतक दाव्यांच्या निपटाऱ्यासाठी बँकेने निर्धारित केलेल्या प्रक्रीये नुसार आवश्यक ती कागदपत्रे सादर करून त्यास बँकेची मंजुरी मिळाल्यानंतर त्यानुसार पात्र व्यक्तींना तसेच अशा बाबतीत जर दावेदारांनी सक्षम न्यायालयाचा हुकुम मिळविला असेल तर अशा व्यक्तींना परीचालन करता येईल अथवा लॉकर मधील जिन्नस त्याची

यादी करून काढून घेण्यास परवानगी दिली जाईल. मात्र अशा लॉकर च्या बाबत जर एखाद्या व्यक्तीने सक्षम न्यायालयाचा आदेश प्राप्त केला असेल तर वरीलपैकी कोणतीही परिस्थिती असेल तरी केवळ अशाच व्यक्तीस न्यायालयाच्या आदेशानुसार लॉकर चे परिचालन करता येऊ शकेल. याही बाबत किल्ली नसेल तर अशा व्यक्तींच्या अर्जावरून लॉकर ब्रेक ओपन करण्याची प्रक्रिया करावी लागेल, ज्याच्या खर्च परिणामाची जबाबदारी अशा अर्जदारांची राहील.

१६. लॉकर सुविधा बंद करणे, जिन्नस परत करणे, जप्ती इ. वर उल्लेख केलेल्या कलमां शिवाय खाली नमूद केलेल्या परिस्थितीत बँक एकतर्फी लॉकर सुविधा बंद करून त्याचा ताबा घेऊ शकेल. जर लिहून देणार यांनी या बाबत सहकार्य न केल्यास, किल्ली न दिल्यास बँक ब्रेक ओपन करून ताबा घेऊ शकेल, ज्याच्या खर्च व परिणामांची जबाबदारी लिहून देणार यांची राहील –

(क) जर लॉकर चा वापर अवैध अवांछित कारणासाठी, गुन्ह्यातील वस्तू, घातक, ज्वलनशील, स्फोटक पदार्थ ठेवण्यासाठी होत असेल, त्यातील वस्तूंमुळे इतर लॉकर, व्यक्ती, मालमत्ता यास धोका, उपसर्ग संभवत असेल, तर, अथवा

(ख) जर सलग तीन वर्षाच्या कालावधीचे भाडे भरले नसेल अथवा कराराच्या इतर अटी आणि शर्तींचा भंग केला असेल तर,

(ग) जर लॉकर चे परिचालन सात वर्षाच्या कालावधीसाठी झालेले नसेल आणि लिहून देणार यांचा पत्ता, ठावठिकाणा, माहिती मिळत नसेल, तर जरी लॉकर चे भाडे वसूल होत असेल तरीही बँकेस अशा लॉकर बाबत त्यातील ऐवज, जिन्नस लिहून देणार यांचे नॉमिनी, वारसदार यांच्याकडे सुपूर्द करून अथवा ते उपलब्ध नसतील, किंवा त्यांनी घेण्यास नकार दिल्यास बँक त्याची योग्य आणि पारदर्शी पद्धतीने विल्हेवाट लावू शकेल आणि बँकेचा खर्च, ब्रेक ओपनचा खर्च त्यातून वसूल करू शकेल

(घ) जर एखाद्या न्यायालयाने अथवा कायदे पालनाचे, जप्तीचे अधिकार असणाऱ्या अधिकाऱ्याने लॉकर ची जप्ती करून त्यातील ऐवज ताब्यात घेतले, घेण्याचे आदेश दिले तर बँक याबाबत सहकार्य करून अशा आदेशांची अंमलबजावणी करेल आणि त्यासाठी बँकेस कोणत्याही प्रकारे जबाबदार धरता येणार नाही.

१७. या करारात तसेच भाड्यामध्ये बदल करण्याचे अधिकार बँकेस राहतील आणि ते लिहून देणार यांचेवर बंधनकारक असतील. येणेप्रमाणे लिहून देणार यांनी हा करार आणि त्याबाबतचे रिझर्व बँक आणि बँकेचे नियम समजून त्यावर स्वतःची स्वाक्षरी केली आहे. हा करार लिहून देणार यांचे वाली वारस यांचेवरही बंधनकारक राहील.

१. श्री/सौ/कु. ____________________

२. श्री/सौ/कु. ____________________

(लिहून देणार)

<u>लिहून घेणार संपदा सहकारी बँक लि. यांचे वतीने</u>

## FORM SL 1A
[Vide para 1.5.2 (I)(a)]

Nomination under section 45ZE of the Banking Regulation Act, 1949, and the Rule 4(2) of the Banking Companies (Nomination) Rules 1985, by Joint Hirers in respect of Safety Lockers

We, ______________________________

name and address

______________________________

name and address

nominate the following person(s) to whom in the event of death of one or more of us ______________________________

(name and address of branch/office in which the locker is situated)

may give access to the locker and liberty to remove the contents of locker, particulars whereof are given below, jointly with the survivor(s) of us.

| Locker | | | Nominee(s) | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Type of Locker | Locker No. | Additional Details, if any | Name, Address & Contact No. | Relationship with Hirer, if any | Age | Nominee's date of birth (if minor) |
| | | | | | | |

Guardian details (if nominee is a minor)

______________________________

(Name and Address)

______________________________

Place :

Date:

Signature/Thumb impressions of hirers

Name (s) Signature(s) and Address(es) of witness(es)@

______________________________

*Where the locker is hired solely in the name of a minor, the nomination should be signed by a person lawfully entitled to act on behalf of the minor

@ Thumb impression(s) shall be attested by two witnesses

------------------------------tear here------------------------------

### ACKNOWLEDGEMENT - SL1A

We acknowledge receipt of nomination made by you in favour of ______________________________

______________________________

______________________________

(Name, address and age of nominee(s))

In respect of the Locker no.____hired by you.

Date :

Yours faithfully,

Signature of Bank official with seal

esfb/fr/aug16/serv/00013

## FORM SL1

[Vide para 1.5.2 (I)(a)]

Nomination under section 45ZE of the Banking Regulation Act, 1949, and the Rule 4(2) of the Banking Companies (Nomination) Rules 1985, by **Sole Hirer in respect of Safety Lockers**

I, ____________________________________________
(Name and address)
____________ nominate the following person to whom in the event of my/minor's death ____________
____________________________________________
(name and address of branch/office in which the locker is situated)
may give access to the locker and liberty to remove the contents of locker, particulars whereof are given below.

| Locker | | | Nominee | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Type of Locker | Locker No. | Additional Details, if any | Name, Address & Contact No. | Relationship with Hirer, if any | Age | Nominee's date of birth (if minor) |
| | | | | | | |

Guardian details (if nominee is a minor)
____________________________________________
(Name and Address)
____________________________________________

Place :

Date:

Signature/Thumb impressions of hirers

Name (s) Signature(s) and Address(es) of witness(es)@
____________________________________________

*Where the locker is hired solely in the name of a minor, the nomination should be signed by a person lawfully entitled to act on behalf of the minor

@ Thumb impression(s) shall be attested by two witnesses

------------------------------Tear here------------------------------

### ACKNOWLEDGEMENT - SL1

We acknowledge receipt of nomination made by you in favour of ____________
(Name, of nominee)
____________________________________________, age ____ years, in respoect of the Locker
(Address of nominee)
no. ____ hired by you.

Yours faithfully,

Date :

Signature of Bank official with seal